# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- २१३/२०१९**

**तक्रारकर्ता श्री. विनोदकुमार बंशराज मौर्य**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार**
उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.), भांडूप यांचे कार्यालय, टोपीवाला कॉलेज इमारत, तळमजला, सरोजिनी नायडू रोड, मुलुंड पश्चिम, मुंबई ४०००८०.

**प्रथम अपिलीय अधिकारी**
उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.), भांडूप यांचे कार्यालय, टोपीवाला कॉलेज इमारत, तळमजला, सरोजिनी नायडू रोड, मुलुंड पश्चिम, मुंबई ४०००८०.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २२.०८.२०२४**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र.MHSICMU/२०१९/M/०००२२२ प्रकरणी आयोगाने दि.१२.०३.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"जन माहिती अधिकारी यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडून अपिलार्थी यांनी मागितलेल्या सर्व सीडी प्राप्त करून १५ दिवसामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(६) अंतर्गत निशुल्क पुरवाव्या. अपील निकाली काढण्यात येत आहे."*

उक्त आदेशानुषंगाने तक्रारकर्ता यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. ०२.०५.२०१९ रोजी आयोगासमोर तक्रार अर्ज दाखल केला. सदर तक्रारीवर जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपजिल्हाधिकारी (अति/ निष्का) भांडूप यांचे कार्यालय, मुलुंड (पश्चिम), मुंबई यांच्याकडून आयोगाने दि.२३.०५.२०१९ च्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (अति/ निष्का) भांडूप यांनी त्यांचा अहवाल दि. ०७.०६.२०१९ आयोगास सादर केलेला आहे.

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी असे सादर केले की, त्यांच्याकडे सदर प्रकरणी कोणतेही कागदपत्रे उपलब्ध नाहीत. जन माहिती अधिकारी यांना आयोगाच्या अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात आली. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २३.०९.२०२४ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

निर्गमित
दिनांक 28 AUG 2024
मुंबई

State Information Commission Greater Mumbai

(डॉ. प्रदीप व्यास)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

दिनांक : २६.०८.२०२४

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- २१३/२०१९**
**तक्रारकर्ता श्री. विनोदकुमार बंशराज मौर्य**

**सुनावणी दिनांक : २३.०९.२०२४ (In continuation of order dt २६.०८.२०२४)**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

या प्रकरणी आयोगाने दिनांक २६.०८.२०२४ रोजी पुढीलप्रमाणे आदेश पारीत केले होते:

" सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असे सादर केले की, त्यांच्याकडे सदर प्रकरणी कोणतेही कागदपत्रे उपलब्ध नाहीत. जन माहिती अधिकारी यांना आयोगाच्या अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात आली. सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि.२३.०९.२०२४ रोजी घेण्यात येईल.

उक्त आदेशानुषंगाने आजच्या सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे निवेदन दिनांक २३.०९.२०२४ आयोगास सादर केले. ते अभिलेखावर घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी मुख्य समन्वय अधिकारी, बायोमॅट्रीक सर्वेक्षण कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचे दि.१९.०९.२०२४ चे पत्र आयोगास सादर केले. जिथे की, बायोमॅट्रीक सर्वेक्षण कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी जन माहिती अधिकारी यांना झोपडी क्रमांक S_१२६०१५९१, S_१२६०१५९२, S_१२६०१५९४ या तीनही झोपडींबाबत सर्वेक्षण केल्याची माहिती पेनड्राईव्हमध्ये उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच तसेच सदर पत्रात असे नमूद केले आहे की, झोपडी क्रमांक S_१२६०१५९० चे बायोमेट्रीक सर्वेक्षण करण्यास झोपडीधारकांने नकार दिल्याने सर्वेक्षण करण्यात आलेले नाही.

सुनावणी दरम्यान सदर पत्राची प्रत व पेनड्राईव्हमधील माहिती जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्त्यास उपलब्ध करुन दिली.

तक्रारकर्त्यांनी आयोगास लेखी सादर केले की, त्यांना बायोमॅट्रीक सर्वेक्षणाची माहिती प्राप्त झालेली आहे परंतू पेन ड्राईव्हमध्ये व्हीडीओ रेकॉर्डीग नाही.

जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा एकदा मुख्य समन्वय अधिकारी, बायोमॅट्रीक सर्वेक्षण कक्ष यांना संपर्क साधून व्हीडीओ रेकॉर्डीग उपलब्ध असल्यास ते पण तक्रारकर्त्यास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसात नि:शुल्क उपलब्ध करुन द्यावेत.

**आदेश**

**१. जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२. पुढील सुनावणी २३.१०.२०२४ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल**

निर्गमित
दिनांक 01 OCT 2024
मुंबई

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**दिनांक : २४.०९.२०२४**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- २१३/२०१९**
**तक्रारकर्ता श्री. विनोदकुमार वंशराज मौर्य**
**सुनावणी दिनांक : २३.१०.२०२४ (In continuation of order dt २४.०९.२०२४)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०४.१०.२०२४ रोजी नोटीस प्राप्त.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०४.१०.२०२४ रोजी नोटीस प्राप्त.) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित -----"----- |

या प्रकरणी दिनांक २३.०९.२०२४ रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी पेनड्राईव्ह मध्ये माहिती उपलब्ध करुन दिली होती. तेव्हा अपिलार्थी यांनी आयोगास लेखी सादर केले की, त्यांना बायोमॅट्रीक सर्वेक्षणाची माहिती प्राप्त झाली. परंतू व्हीडीओ रेकॉर्डिंगची माहिती प्राप्त झालेली नाही. तेव्हा आयोगाने व्हीडीओ रेकॉर्डींग उपलब्ध असल्यास तक्रारकर्त्यांस १५ दिवसात उपलब्ध करुन द्यावेत. या प्रकरणी २३.१०.२०२४ रोजी घेण्यात येईल, असे आदेशित केले होते.

उक्त आदेशाच्या अनुषंगाने आजच्या सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांनी त्यांचे दि.०४.१०.२०२४ रोजीचे ईमेलद्वारे त्यांचे दि.२३.०९.२०२४ चे पत्र आयोगास सादर केलेले आहे, जेथे की नमुद केले आहे की, त्यांना दि. २३.०९.२०२४ रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान पेनड्राईव्ह तपासल्यावर त्यांना हवे असलेले दस्तावेज व्यवस्थित होते. त्यांनी त्यांच्या चुकीबद्दल दिलगिरी व्यक्त करुन तक्रार मागे घेण्याबाबत कळविले आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षांवर येत आहे की, तक्रारकर्त्यांना सर्व माहिती मिळालेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

सही 28-10-2024

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २८.१०.२०२४**

State Information Commission * Greater Mumbai *